आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र -संध्याकाळी ७.०० वाजता

८ नोव्हेंबर २०२४ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराला जोर, राज्यभरात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्यासह सर्वपक्षियांच्या सभा

- राज्याच्या विकासाला महायुती सरकारच चालना देऊ शकेल, असं प्रचारसभेत ज्येष्ठ नेते, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- आजपासून राज्यात काही ठिकाणी गृहमतदानाला सुरुवात, प्रशासनाकडून मतदार जागृतीसाठी विविध उपक्रम

- ईडीच्या कारवाईतून सुटका करून घेण्यासाठी महायुती सरकारमध्ये सामील झाल्याच्या वृत्ताचं छगन भुजबळ यांच्याकडून खंडन

**आणि**

- भारत आणि दक्षिण अफ्रिकेदरम्यानच्या चार टी-20 क्रिकेट सामन्यांच्या मालिकेला आजपासून सुरुवात

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकांसाठीच्या प्रचाराने वेग घेतला आहे. भाजपाचे ज्येष्ठ नेते, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज धुळ्यात जाहीर सभा घेतली. महाराष्ट्राच्या विकासाला चालना देण्याचं काम केवळ महायुतीचं सरकारच करु शकतं असं त्यांनी सांगितलं. महिला सक्षमीकरण, युवकांना रोजगार, आदिवासींचे हक्क इत्यादी क्षेत्रात युती सरकारनं राबवलेल्या योजनांचा उल्लेख त्यांनी केला. महाविकास आघाडीनं अनेक विकासप्रकल्पांच्या मार्गात खोडा घातला असा आरोप त्यांनी केला. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा आपल्या सरकारनं मिळवून दिल्याची आठवण

करुन देत त्यांनी डबल इंजिन सरकार निवडून देण्याचं आवाहन मतदारांना केलं. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचंही भाषण यावेळी झालं. शेतकऱ्यांना पाणीपुरवठा, औद्योगिक विकास, रस्ते आणि पायाभूत सुविधा विकास अशी आश्वासनं त्यांनी दिली. विधानसभा निवडणुकीसाठी मोदींची महाराष्ट्रातली ही पहिलीच प्रचारसभा होती. या जाहीर सभेला केंद्रीय राज्य मंत्री प्रतापराव जाधव, रक्षा खडसे, मंत्री दादा भुसे, अनिल पाटील, आदी उपस्थित होते.

महायुती सत्तेवर आल्यास किसान सन्मान निधीची रक्कम १२ हजारावरुन १५ हजार करण्याचं आश्वासन मोदी यांनी नाशिक शहरात पंचवटी इथल्या प्रचारसभेत दिलं. महाराष्ट्राचं लाडकं व्यक्तिमत्व पु. ल. देशपांडे यांच्या जयंतीनिमित्त त्यांनी आदरांजली वाहिली. जनहितासाठी उज्ज्वला योजना, जलजीवन मिशन, नळाद्वारे घराघरात पिण्याचं पाणी, मोफत अन्नधान्य, पीएम आवास योजनेत घर, कापूस-धान-सोयाबीन पिकांना अधिक हमी दर, दुधाच्या दरात वाढ तसंच शेतकऱ्यांसाठी कांदा निर्यातीवरचे निर्बंध हटवण्याचा निर्णय सरकारनं घेतल्याचा उल्लेख त्यांनी केला. यावेळी केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे, भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री छगन भुजबळ, राधाकृष्ण विखे पाटील आदि उपस्थित होते.

**<><><><><>**

केंद्रीय मंत्री आणि भाजपा नेते अमित शहा यांच्या दोन प्रचारसभा आज राज्यात झाल्या. केंद्रात पृथ्वीराज चव्हाण, शरद पवार २००४ ते २०१४ या कालावधीत दहा वर्षे सत्तेत असतानाच्या काळात महाराष्ट्राला केवळ १ लाख ९१ हजार कोटी रूपये निधी मिळाला तर, मोदी सरकारच्या दहा वर्षांच्या कार्यकाळात १० लाख १५ हजार ८९० कोटी रूपये निधी मिळाला असल्याचं त्यांनी सातारा इथल्या सभेत सांगितलं.

भारताला सर्व क्षेत्रात सर्वोत्तम बनवणं हे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं लक्ष्य असून हे एनडीए सरकारच करु शकतं असं शहा यांनी सांगली जिल्ह्यात शिराळा इथल्या प्रचारसभेत सांगितलं.

**<><><><><>**

राज्यात महायुतीचं सरकार आल्यावर पहिल्या शंभर दिवसांचं व्हिजन मांडत त्यानुसार काम करणार असल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज धारशिव इथल्या प्रचार सभेत सांगितलं. महायुतीचे धाराशिवचे उमेदवार अजित पिंगळे आणि तुळजापूर विधानसभा मतदारसंघातले उमेदवार राणा जगजित सिंह पाटील यांच्या प्रचार सभेत ते बोलत होते. जीवनावश्यक वस्तूंचे भाव स्थिर राखत महागाई आटोक्यात ठेवू, २५ लाख रोजगार निर्मिती करू आणि लाडक्या बहिणींना एकवीशसे रुपयांच्या मदतीचं आश्वासनही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिलं.

**<><><><><>**

राज्यात आणि देशात महिला सुरक्षित नसून भ्रष्टाचार वाढला आहे, देशात सध्या मोदी यांची हुकूमशाही सुरू आहे, अशी टीका ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी केली. ते आज परभणी जिल्ह्यात सेलू इथं प्रचारसभेत बोलत होते. महविकास आघाडीचं सरकार आल्यावर महिलांना दरमहा तीन हजार रुपये, बसचा मोफत प्रवास, जातनिहाय जनगणना करून ५० टक्के आरक्षणाची मर्यादा काढून आरक्षण, कृषी समृध्दी योजनेत ३ लाखांपर्यंत कर्ज माफी, बेरोजगार तरुणांना ४ हजार रुपये मदत हे निर्णय घेणार असल्याचं पवार यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीत भाजप आणि मित्रपक्षांना पराभव दिसत आहे, त्यामुळेच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा जाती आणि

धर्माच्या नावानं मतं मागत असल्याची टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी आज मुंबईत केली.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पवित्र भूमीत जाती धर्माच्या नावावर माथी भडकावून राजकीय पोळी भाजण्याचा मोदी-शाह यांचा प्रयत्न जनता खपवून घेणार नाही असं पटोले म्हणाले.

**<><><><>**

शिवाजी महाराजांचा पुतळा उभारताना महायुती सरकारनं भ्रष्टाचार केल्याचा आरोप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अध्यक्ष उद्धव ठाकरे यांनी आज बुलढाणा इथं केला. महाविकास आघाडीच्या उमेदवार जयश्री शेळके यांच्या प्रचारसभेला ते संबोधित करत होते. महाविकास आघाडीनं गेल्या काही काळात विकासकामं केली. पीकविमा, सोयाबीनला भाव, शेतकऱ्यांना कर्जमाफी, कोरोना काळात औषधं अशी कामं आपल्या सरकारनं केल्याचं उद्धव ठाकरे यावेळी म्हणाले.

**<><><><>**

**वाशिम** जिल्ह्यात विधानसभा निवडणुकीसाठी आज गृहमतदान होत आहे. निवडणूक अधिकारी दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांच्या घरी जाऊन बॅलेट पेपरद्वारे मतदानाची प्रक्रिया राबवत आहेत. गृहमतदानासाठी रिसोड मतदारसंघात ५४६, वाशिम मतदारसंघात ४३२ तर कारंजा मतदारसंघात ४७९ मतदारांनी नोंद केली आहे.

**सोलापूर** जिल्ह्यातही आजपासून गृहमतदानाला सुरुवात झाली.  विविध तालुक्यात मिळून सुमारे ५ हजार ३१६ मतदारांनी गृहमतदानासाठी नोंदणी केली आहे.

**अमरावती** जिल्ह्यात १४ नोव्हेंबरपासू◌ून गृहमतदानाला सुरुवात होणार आहे. जिल्ह्यात दोन हजार ८६२ नागरिकांनी गृहमतदानासाठी नोंद केली आहे.

**जळगाव** जिल्ह्यात मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी जिल्हा प्रशासन विविध उपक्रम राबवत आहे. महानगरपालिका आणि जिल्हा परिषदेनं◌ं मतदान जागृतीसाठी रील्स बनवण्याची स्पर्धा आयोजित केली आहे. उत्तम रील्स बनवणाऱ्यांना पारितोषिक दिलं जाणार असल्याचं प्रशासनानं सांगितलं आहे.

**धुळे** शहरात १० नोव्हेंबर रोजी गृहमतदान होणार आहे. यासाठी चौदा पथकं नेमली असून प्रत्येक पथकामध्ये दोन मतदान अधिकारी, एक पोलीस कर्मचारी आणि सूक्ष्म निरीक्षक आणि एक व्हिडीओ ग्राफर असणार आहे. जे मतदार या दिवशी मतदान करू शकणार नाहीत त्यांच्यासाठी १२ नोव्हेंबर रोजी मतदानाची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे.

नागरिकांनी मतदानाचा हक्क बजवावा, असं आवाहन विविध मान्यवर आणि सेलिब्रिटी करत आहेत. प्रसिद्ध दिग्दर्शक आणि निर्माते सचिन गोस्वामी म्हणाले….

**होल्ड - सचिन गोस्वामी (२३ सेकंद)**

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदार जागृतीसाठी राबवण्यात येणाऱ्या स्वीप कार्यक्रमाअंतर्गत केंद्रीय संचार ब्यूरो आणि निवडणूक आयोगाच्या वतीनं एक फिरतं प्रदर्शन आजपासून सुरु झालं. प्रदर्शन लावलेल्या या गाड्या १५ निवडक जिल्ह्यांमधे मतदानविषयक जनजागृतीचा संदेश घेऊन जाणार आहेत.

**तुळजापूर** इथल्या अभियांत्रिकी महाविद्यालयात विद्यार्थ्यांना, कर्मचाऱ्यांना मतदारांना ‘मी मतदान करणार, तुम्ही मतदान करा’. अशा आशयाची शपथ देण्यात आली. यावेळी तहसीलदार अरविंद बोळंगे आणि इतर अधिकारी उपस्थित होते. येत्या २० नोव्हेंबर रोजी विधानसभा निवडणुकीसाठी मतदान असल्यानं राज्यात सर्वत्र सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.

आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक  बातमीपत्र -संध्याकाळी  ७.०० वाजता

८ नोव्हेंबर २०२४ - शुक्रवार

<><><><>

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज अमरावती जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

<><><><>

ईडीच्या कारवाईतून सुटका करून घेण्यासाठी महायुती सरकारमध्ये सामील झाल्याच्या वृत्ताचं राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांनी खंडन केलं आहे. आपण ओबीसी असल्यामुळे आपल्यावर कारवाई झाली, असं भुजबळ यांनी म्हटल्याचं वृत्त ज्येष्ठ पत्रकार राजदीप सरदेसाई यांनी लिहीलेल्या पुस्तकाचा हवाला देत एका दैनिकाने छापलं आहे. मात्र या दैनिकाबरोबर आपली काही मुलाखत झालेली नाही, आपण कोणतंही  पुस्तक लिहीलेलं नाही, तसंच ईडीच्या कारवाईचा आणि आपण सरकारमधे सामील होण्याचा काहीही संबंध नाही, असं स्पष्टीकरण भुजबळ यांनी आज नाशिकमधे वार्ताहर परिषदेत दिलं.

<><><><>

भारत आणि दक्षिण अफ्रिकेदरम्यानच्या चार टी-20 क्रिकेट सामन्यांच्या मालिकेतला पहिला सामना आज रात्री डर्बनमध्ये होणार आहे. भारतीय प्रमाणवेळेनुसार रात्री साडेआठ वाजता सामन्याला सुरूवात होईल.

//<><><><><>//